प्रेसनोट

सिंधुदुर्ग जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील ११८ पोलीस शिपाई (५ बॅण्डस्मन पदासह) व २४ चालक पोलीस शिपाई रिक्त पदांसाठी दि.०१/०३/२०२४ रोजी जाहिरात प्रसिद्ध करुन दि.०५/०३/२०२४ ते दि.१५/०४/२०२४ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने आवेदन अर्ज मागविण्यासाठी policerecruitment२०२४.mahait.org या संकेतस्थळावर महाराष्ट्र पोलीस भरती प्रक्रीया सुरु करण्यात आलेली होती. त्याप्रमाणे पोलीस शिपाई पदासाठी ५९२० बॅण्डस्मन पदासाठी ७८३ व चालक पोलीस शिपाई पदासाठी १३३९ असे एकूण ८०४२ अमेदवारांचे आवेदन अर्ज प्राप्त झालेले आहेत. आवेदन अर्ज वैध ठरलेल्या उमेदवारांची मैदानी चाचणी दि.१९/०६/२०२४ ते ०१/०७/२०२४ या कालावधीत पोलीस मुख्यालय येथील परेड मैदानावर घेण्यात येणार आहे. याकरीता उमेदवारांना दि.१९/०६/२०२४ त ०१/०७/२०२४ या कालावधीत टप्याटप्याने महाआयटी विभागाकडून प्रवेशपत्र उमेदवारांच्या ई-मेल/एसएमएस या माध्यमाद्वारे निर्गमित केलेले आहेत. सद्या पाऊसाचा हंगाम सुरु झाल्याने ज्यादिवशी पाऊस जास्त असेल त्यादिवशी उमेदवारांची कागदपत्र पडताळणी व उंची, छाती मोजमाप घेवून दि.२/७/२०२४ रोजी नंतर पावसाचे वातावरण पाहून मैदानी चाचणीकरीता बोलाविण्यात येणार आहे. मैदानी चाचणीवेळी उमेदवारांना शारीरिक इजा पोहचू नये यासाठी योग्य खबरदारी घेण्यात आलेली असून त्याकरीता वैद्यकिय पथक उलपब्ध ठेवण्यात आलेले आहेत. ज्या उमेदवारांनी (पोलीस शिपाई/बॅण्डस्मन/चालक पोलीस शिपाई/सशस्त्र पोलीस शिपाई/कारागृह शिपाई) या पदाकरीता आवेदन अर्ज भरलेले आहेत अशा उमेदवारांना या एकाचदिवशी अथवा लागोपाठचे दिवशी दोन पदाकरीता प्रवेश निर्गमित झालेले आहेत, असा उमेदवारा या घटकातील पोलीस भरतीच्या दिनांकास उपलब्ध राहू शकला नाही तर अशा उमेदवारास पहिल्या ठिकाणी हजर राहील्याबाबतचा लेखी पुरावा दिल्यानंतर त्या उमेदवारांना या घटकात भरतीसाठी दुसरी तारीख देण्यात येणार आहे. या घटकात आवेदन अर्ज भरलेला उमेदवार भरती प्रक्रीयेपासून वंचीत रहाणार नाही, याची काळजी घेण्यात आलेली आहे.

सदर भरती प्रक्रीया ही तटस्थपणे, नि:पक्षपातीपणे व पारदर्शक पार पाडली जाणार असून भरतीप्रक्रीये दरम्यान गैरप्रकार व भ्रष्टाचार होणार नाही याकरीता योग्य ती खबरदारी घेण्यात आलेली आहे. पोलीस भरती प्रक्रीये दरम्यान उमेदवारांना व त्यांचे नातेवाईकांना भ्रष्टाचारी प्रवृत्तीच्या लोकांकडून ओळखी संदर्भात व अन्य प्रकाराचे आमिष दाखवून आर्थिक देवाण घेवाणीचे गैरव्यवहार करुन फसवणुक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे गैरप्रकार रोखण्यासाठी पोलीस अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग येथे समन्वय अधिकारी म्हणून स्वतंत्र पोलीस अधिकाऱ्यांची नेमणुक करण्यात आलेली आहे. अशा प्रकारचे गैरव्यवहार निदर्शनास आल्यास त्याबाबतची माहिती पोलीस नियंत्रण कक्ष, सिंधुदुर्ग येथील व्हॉटसअॅप क्र. ८२७५७७६२१३ वर व दुरध्वनी क्र. ०२३६२-२२८२०० वर तात्काळ दयावी असे आवाहन पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांनी केले आहे.

Scanned with OKEN Scanner